आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी - डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१

जा.क्र. राआसो/HWC /कामकाज/.................../२१-२२ 923328-802
दि.२४/०१/२०२२ २५

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व

**विषय – समुदाय आरोग्य अधिकारी यांना प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी कामकाज न देणेबाबत.**

संदर्भ - मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची दि.२०/१२/२०२१ रोजीची मान्य टिपणी.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये काही जिल्हयातील समुदाय आरोग्य अधिकारी यांना प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्यालयात काम करण्याबाबत सक्ती करण्यात येत असल्याची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

त्याअनुषंगाने मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या मान्य टिपणी अन्वये खालील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

- समुदाय आरोग्य अधिकारी यांना प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्यालयात दैनंदिन कामकाज (OPD-Emergency etc.) संबंधी कोणतीही जबाबदारी देवू नये. कोविड किंवा इतर आपत्कालीन परिस्थितीमध्ये आवश्यक तेवढया दिवसांसाठीच त्यांच्या सेवा PHC/CCC येथे देण्यात याव्यात.
- समुदाय आरोग्य अधिकारी यांना प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी कामकाज दिले असल्याचे आढळून आल्यास आदेशित कालावधीतील समुदाय आरोग्य अधिकारी यांचे वेतन वैद्यकीय अधिकारी/संबंधित अधिकारी यांच्या कडून वसूल करण्यात यावे.

२५/१/२२

**डॉ. सतीश पवार,**
**अति. अभियान संचालक,**
**राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर-**

१. मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२. मा. संचालक आरोग्य सेवा, मुंबई
३. मा. संचालक आरोग्य सेवा, पुणे

**प्रत माहितीस्तव -**

१. उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व)
२. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व)